# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ११८-२२** **दिनांक :- २६/०४/२०२२**

## सोन्याच्या दुकानातून चोरी करुन पळून जाणाऱ्या आरोपीस अटक करुन ५,०६,८५०/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत-नवघर पोलीसांची कामगिरी.

दिनांक १५.०४.२०२२ रोजी तक्रारदार श्री. जंटु चित्तरंजन घोष, वय ४० वर्षे यांनी नवघर पोलीस ठाण्यात येऊन कळविले की, त्यांचा अशोक शॉपींग सेंटर, भाईंदर पुर्व येथे सोन्याचे दागिन्यांचे डिझाईन करण्याचा गाळा आहे. सदर ठिकाणी काम करणारा कारागिर प्रबीर सामंता हा ०५,१०,०००/- रु. किं. चे १७० ग्रॅम वजनाचे सोने रिंग चोरी करुन पळुन गेलेला आहे. सदरबाबत तक्रारदार यांचे तक्रारीवरुन नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २९०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३८१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीताचा लवकरात लवकर शोध घेवून सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी आदेश दिले होते. त्याअनुषंगाने नवघर पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेवुन गुन्हयाचा तपास सुरु केला. गुन्हयाचे तपासात फिर्यादीकडुन आरोपीबाबत उपयुक्त अशी काहीएक माहित मिळुन आलेली नसतांना गुन्हे पकटीकरण तपास पथकाने आरोपीताची माहिती काढुन त्याचा सी.सी.टिव्ही कॅमेरे व तांत्रीक माहितीचे आधारे तपास सुरु केला. नमुद आरोपी प्रबीर जयदेव सामंता, वय ४२ वर्षे, मुळ राहणार हावडा, राज्य-पश्चिम बंगाल हा त्याचे मुळ गावी पश्चिम बंगाल येथे पळुन जाण्याचे तयारीत असतांना त्यास ग्रँड रोड, मुंबई येथुन ताब्यात घेऊन अटक करण्यात आलेली आहे. आरोपीताकडुन पोलीस कस्टडी दरम्यान ५,०६,८५०/- रु. किंमतीचे १६८.९५ ग्रॅम वजनाचे सोने हस्तगत करुन गुन्हा उघडणीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. श्री. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजीत लांडे, पोहवा/भुषण पाटील, पोना/गणेश जावळे, पोशि/सुरज घुनावत, पोशि/ओंमकार यादव व पोशि/विनोद जाधव यांनी केलेली आहे.

--------------ooooo---------------